**<u>ठळक बातम्या</u>**

- पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत मंत्रीमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठक सुरू

- पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा सार्वत्रिक निषेध, पर्यटकांना राज्यात परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू

- राज्यातल्या शेतकऱ्यांनी पिकवलेली सगळी तूर किमान आधारभूत दरानं खरेदी करायला केंद्रसरकारची मंजुरी

**आणि**

- शेअर बाजारात सलग सातव्या दिवशी तेजी, सेन्सेक्स पुन्हा ८० हजाराच्या वर, सोनं अडीच हजार रुपयांनी स्वस्त

**<><><><><>**

पहलगाम इथल्या दहशतवादी  हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नवी दिल्लीतल्या निवासस्थानी मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठक सुरू आहे. या बैठकीत गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल उपस्थित आहेत.

या दहशतवादी हल्ल्यात राज्यातल्या एकूण ६ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. त्यातले डोंबिवलीचे संजय लेले आणि पनवेलचे दिलीप डिसले यांचं पार्थिव मुंबईत पोहोचलं आहे. हेमंत जोशी आणि अतुल मोने यांचं पार्थिव मुंबईत आणि कौस्तुभ गणवते आणि संतोष जगदाळे यांचं पार्थिव थोड्याच वेळात पुण्यात पोहोचेल.

या हल्ल्यात जखमी झालेले राज्यातले चार पर्यटक सुखरूप असून, त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला असल्याचं दिल्लीच्या महाराष्ट्र परिचय केंद्राने कळवलं आहे. तसंच, जम्मू-कश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या राज्यातल्या इतर

पर्यटकांची माहिती गोळा करण्याचं काम सुरू आहे. आतापर्यंत ३०८ पर्यटकांशी संपर्क साधला गेला आहे. स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून या पर्यटकांच्या निवास आणि पुढच्या प्रवासाची व्यवस्था करण्यात येत आहे. मृतांच्या कुटुंबांना राज्यशासनानं प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. काश्मीरमधे अडकलेल्या पर्यटकांना सुखरुप राज्यात परत आणण्याला शासनाचं प्राधान्य राहील असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं.

**होल्ड- बाईट- फडनवीस**

जम्मू काश्मीर सरकारनं मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपये आणि गंभीररित्या जखमी झालेल्यांना प्रत्येकी २ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे कटरा ते दिल्ली विशेष गाडी आज रात्री सोडणार आहे. प्रवाशांच्या मदतीसाठी रेल्वेने विशेष हेल्पलाईन क्रमांक जम्मू - तावी, श्री माता वैष्णोदेवी कटरा आणि उधमपूर या स्थानकांसाठी उपलब्ध करुन दिले आहेत.

श्रीनगर हून दिल्ली आणि मुंबई करता मिळून ४ विशेष विमानं सोडण्यात आली, आणि प्रवाशांच्या मागणीनुसार आणखी विमानसेवा उपलब्ध करुन दिल्या जातील असं नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधे पहलगाम इथं दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याचा राज्यात सर्वत्र निषेध होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला असून काश्मीरमधे अडकलेल्या राज्यातल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी  शासन सज्ज असल्याचं म्हटलं आहे.

राज्यातल्या विविध राजकीय पक्षांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे.

**मुंबईत** शहर भाजपनं कांदिवली इथं  भारतीय जनता पक्षानं दहशतवादी हल्ल्याचा निषेध व्यक्त करत आंदोलन केलं. या भीषण हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना  यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रदेश काँग्रेसने आज मुंबईत दादर इथं निषेध मोर्चा काढला. पहलगाम हल्ल्याप्रकरणी सरकारने सर्व पक्षीय बैठक घेऊन एकमुखी निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

**सोलापुरात** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनं केली. बीड  इथं धुळे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बीड जिल्हा शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी निषेध आंदोलन केलं.

**अहिल्यानगर** शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीनं आंदोलन करण्यात आलं. तर धुळे शहरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनं केली.

**नाशिक** शहरात मनसेनं निषेध केला. तसेच अभाविपच्या वतीने अशोकस्तंभावर निदर्शनं करण्यात आली. पहलगाम हल्ल्यात मरण पावलेले दिलीप देसले यांचं मूळ गाव मालेगाव तालुक्यात झोडगे इथं असून तिथं शोककळा पसरली आहे. हल्ल्याच्या निषेधार्थ मालेगाव मधे  सार्वजनिक नागरी सुविधा समितीने उद्या बंदची हाक दिली आहे. दरम्यान नाशिकमधून पर्यटनासाठी काश्मीरमधे गेलेले ६१ नागरिक सुखरूप असल्याचं जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागानं सांगितलं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधे अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांसाठी विशेष विमानांची व्यवस्था केली जाईल, असं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितलं. श्रीनगरहून मुंबईला उद्या दोन विमानं येणार असून यात १८२ पर्यटक येणार आहेत. यासाठी इंडिगो आणि एअर इंडियाच्या विमानांची व्यवस्था झाली असून याचा खर्च राज्य सरकार करणार असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या कुलगाममधे दहशतवादी आणि सुरक्षा दलाचे जवान यांच्यात चकमक सुरू आहे. कुलगाममधल्या तंगमार्ग परिसरात दहशतवादी असल्याची माहिती मिळताच सुरक्षा दल त्याठिकाणी पोहोचले आणि जवानांनी दहशतवाद्यांना चोहोबाजूंनी घेरल्याचं वृत्त आहे. या परिसरात दोन ते तीन दहशतवादी लपल्याचं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

खरेदी वर्ष २०२४-२५ साठी राज्यात शेतकऱ्यांनी पिकवलेली सगळी तूर किमान आधारभूत दरानं खरेदी करायला केंद्रसरकारनं मान्यता दिली आहे. महाराष्ट्राबरोबरच आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरयाणा, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगण आणि उत्तर प्रदेश या राज्यांमधली एकूण १३ लाख २२ हजार टन तूर याअंतर्गत खरेदी केली जाणार आहे.

आयातीवरचं अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत डाळींचं उत्पादन वाढवण्यात योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, आणि तेलंगणात नाफेड आणि NCCF, अर्थात राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघामार्फत किमान आधारभूत दरानं खरेदी सुरु असून कालपर्यंत ३ लाख ९२ हजार टन तुरीची खरेदी झाली आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ५२१ अंकांची वाढ झाली, आणि तो  ८० हजार ११६ अंकांवर बंद झाला. सुमारे ४ महिन्यानंतर हा निर्देशांक पुन्हा ८० हजारांच्या पलीकडे गेला आहे. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६२  अंकांची वाढ नोंदवत  २४ हजार ३२९ अंकांवर बंद झाला. सोनं आज तोळ्यामागे अडीच हजार रुपयांनी स्वस्त झालं. मुंबईत आज २४ कॅरेट सोन्याचे दर सुमारे ९९ हजार रुपये तोळा झाले होते. तर २२ कॅरेट सोनं ९६ हजार ६०० रुपयांच्या आसपास मिळत होत. चांदी आज किलोमागे १ हजार रुपयांनी महाग झाली आणि ९९ हजार ५०० रुपयांच्या पुढे चांदीचा दर पोहोचला.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होत आहे. हैदराबाद इथं थोडयाच वेळात साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. मुंबईनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय धेतला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या धर्मादाय रुग्णालयाच्या नियंत्रणासाठी विशेष तपासणी पथक स्थापन करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिल्या आहेत. मुंबईत सह्याद्री अतिथीगृह इथं मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची आढावा बैठक मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थित होते.

**<><><><><>**

पोषण पंधरवड्यात हिंगोली जिल्हा परिषदेच्या महिला आणि बालकल्याण विभागानं १ हजार १९७ अंगणवाड्यांमधून तब्बल 74 हजार उपक्रम राबवले. त्या उपक्रमांची दखल घेती गेली असून राज्यात जिल्ह्याचा दुसरा क्रमांक आला आहे. हिंगोली जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका खामार जहा अजमत फारुखी यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं....

**होल्ड.... बाईट.... खामार जहा अजमत फारुखी**

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान चंद्रपूर इथं ४५ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**